जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 FEB 2025

सकाळ

# डॉ. प्रकाश पवार हे ऐतिहासिक राजकारणाचे चिकित्सक विश्लेषक

## डॉ. शिर्के; राज्य वाङ्मय पुरस्काराबद्दल गौरव

■ **सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ११ : डॉ. प्रकाश पवार हे ऐतिहासिक राजकारणाचे चिकित्सक विश्लेषक आहेत. त्यामुळेच त्यांच्या हातून राजमाता जिजाऊ आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्याविषयीची महत्त्वपूर्ण पुस्तके साकार झाली, असे गौरवोद्गार कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या राज्यशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. प्रकाश पवार यांच्या 'राजमाता जिजाऊ : सकलजनवादी क्रांतीच्या शिल्पकार' या पुस्तकाला महाराष्ट्र शासनाच्या यशवंतराव चव्हाण वाङ्मय पुरस्कार योजनेंतर्गत शाहू महाराज पुरस्कार नुकताच जाहीर झाला. या निमित्ताने डॉ. पवार यांना कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते ग्रंथभेट देऊन गौरविले. त्यावेळी ते बोलत होते.

डॉ. पवार म्हणाले, 'या पुरस्काराचे संपूर्ण श्रेय हे विद्यापीठाच्या बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्र आणि डॉ. राजन गवस यांना आहे. विद्यापीठाच्या ग्रंथालयात अनेक दुर्मीळ संदर्भ आणि पुस्तके मिळाल्यामुळेच राजमाता जिजाऊ यांच्याविषयीची बहुमूल्य माहिती संकलित करता आली.'

प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. दीपक पवार, श्रीकृष्ण महाजन, सुहासिनी पाटील, गोविंद कोळेकर, संध्या अडसुळे, आलोक जत्राटकर उपस्थित होते.



कोल्हापूर : डॉ. प्रकाश पवार यांचा शिवाजी विद्यापीठातर्फे सत्कार करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. यावेळी शेजारी डावीकडून संध्या अडसुळे, डॉ. गोविंद कोळेकर, दीपक पवार, श्रीकृष्ण महाजन, पी. एस. पाटील, विलास शिंदे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 FEB 2025
पुण्यनगरी



कोल्हापूर : डॉ. प्रकाश पवार यांना ग्रंथभेट देऊन अभिनंदन करताना कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के. सोबत मान्यवर.

# डॉ. प्रकाश पवार ऐतिहासिक राजकारणाचे चिकित्सक विश्लेषक

## कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के : विद्यापीठातर्फे गौरव

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

डॉ. प्रकाश पवार हे ऐतिहासिक राजकारणाचे चिकित्सक विश्लेषक आहेत. त्यामुळेच त्यांच्या हातून राजमाता जिजाऊ आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्याविषयीची महत्त्वपूर्ण पुस्तके साकार झाली, असे गौरवोद्गार शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या राज्यशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. प्रकाश पवार यांच्या 'राजमाता जिजाऊ : सकलजनवादी क्रांतीच्या शिल्पकार' या पुस्तकाला महाराष्ट्र शासनाच्या यशवंतराव चव्हाण वाङ्मय पुरस्कार योजनेंतर्गत शाहू महाराज पुरस्कार नुकताच जाहीर झाला. या निमित्ताने त्यांचे ग्रंथभेट देऊन अभिनंदन करताना कुलगुरू डॉ. शिर्के बोलत होते.

प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनीही राजमाता जिजाऊ यांच्याविषयीचा हा ग्रंथ अमूल्य स्वरूपाचा असल्याचे गौरवोद्गार काढले.

डॉ. प्रकाश पवार म्हणाले, या पुरस्काराचे संपूर्ण श्रेय हे शिवाजी विद्यापीठाच्या बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राचे आणि डॉ. राजन गवस यांना आहे.

यावेळी मुंबई विद्यापीठाचे डॉ. दीपक पवार, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. गोविंद कोळेकर, संध्या अडसुळे, डॉ. आलोक जत्राटकर उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 FEB 2025
तरुण भारत



कोल्हापूर : डॉ. प्रकाश पवार यांना ग्रंथभेट देताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत संध्या अडसुळे, डॉ. गोविंद कोळेकर, डॉ. दीपक पवार, डॉ. महाजन, डॉ. पाटील, डॉ. शिंदे, डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. जत्राटकर.

# 'डॉ. प्रकाश पवार ऐतिहासिक राजकारणाचे चिकित्सक'

प्रतिनिधी
कोल्हापूर

डॉ. प्रकाश पवार हे ऐतिहासिक राजकारणाचे चिकित्सक विश्लेषक आहेत. त्यामुळेच त्यांच्या हातून राजमाता जिजाऊ आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्याविषयीची महत्त्वपूर्ण पुस्तके साकारली, असे गौरवोद्गार शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी काढले.

शिवाजी विद्यापीठातील राज्यशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. प्रकाश पवार यांच्या 'राजमाता जिजाऊ: सकलजनवादी क्रांतीच्या शिल्पकार' या पुस्तकाला महाराष्ट्र शासनाच्या यशवंतराव चव्हाण वाङ्मय पुरस्कार योजनेअंतर्गत शाहू महाराज पुरस्कार नुकताच जाहीर झाला. या निमित्ताने डॉ. पवार यांचे कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते ग्रंथभेट देऊन अभिनंदन केले. याप्रसंगी ते बोलत होते.

प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी मुंबई विद्यापीठाचे डॉ. दीपक पवार, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. गोविंद कोळेकर, संध्या अडसुळे, डॉ. आलोक जत्राटकर उपस्थित होते.

दै० रणझुंझार

12 FEB 2025

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ. प्रकाश पवार ऐतिहासिक राजकारणाचे चिकित्सक विश्लेषक: कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के

## राज्य वाङ्मय पुरस्काराबद्दल विद्यापीठातर्फे गौरव

कोल्हापूर : डॉ. प्रकाश पवार हे ऐतिहासिक राजकारणाचे चिकित्सक विश्लेषक आहेत. त्यामुळेच त्यांच्या हातून राजमाता जिजाऊ आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्याविषयीची महत्त्वपूर्ण पुस्तके साकार झाली, असे गौरवोद्गार शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या राज्यशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. प्रकाश पवार यांच्या 'राजमाता जिजाऊ: सकलजनवादी क्रांतीच्या शिल्पकार' या पुस्तकाला महाराष्ट्र शासनाच्या यशवंतराव चव्हाण वाङ्मय पुरस्कार योजनेअंतर्गत शाहू महाराज पुरस्कार नुकताच जाहीर झाला. या निमित्ताने डॉ. पवार यांचे कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते ग्रंथभेट देऊन अभिनंदन करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, डॉ. प्रकाश पवार हे आंतरविद्याशाखीय अभ्यासक व संशोधक म्हणून लौकिक मिळवून आहेत. त्यापुढे जाऊन त्यांनी उपलब्ध इतिहास सामग्रीचे चिकित्सक विश्लेषण करून त्याद्वारे राजमाता जिजाऊ आणि छत्रपती शिवाजी महाराज यांची साकारलेली जीवनचरित्रे आजवरच्या चरित्रांपेक्षा वेगळी ठरली आहेत. त्यांच्या 'राजमाता जिजाऊ' या पुस्तकाला राज्य पुरस्कार प्राप्त झाल्याचा विद्यापीठ परिवाराला अत्यंत अभिमान आणि आनंद वाटतो. त्यांच्या या पुढील साहित्यकृतींनाही अनेक मानसन्मान लाभोत, अशा सदिच्छा त्यांनी व्यक्त केल्या.

प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनीही राजमाता जिजाऊ यांच्याविषयीचा हा ग्रंथ अमूल्य स्वरूपाचा असल्याचे गौरवोद्गार काढले. यावेळी बोलताना डॉ. प्रकाश पवार म्हणाले, या पुरस्काराचे संपूर्ण श्रेय हे शिवाजी विद्यापीठाच्या बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राचे आणि डॉ. राजन गवस यांना आहे. विद्यापीठाच्या ग्रंथालयात अनेक दुर्मिळ संदर्भ आणि पुस्तके मिळाल्यामुळेच राजमाता जिजाऊ यांच्याविषयीची बहुमूल्य माहिती संकलित करता आली. चार वर्षे हे संशोधन सुरू राहिले. त्या आधारे लेखन करीत गेलो. हे लेखन डॉ. गवस यांनी वाचकांसमोर आणण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. त्यामुळेच सहा हजार प्रतींची आवृत्ती अवघ्या वर्षभरात संपण्याच्या मार्गावर आहे, असे त्यांनी सांगितले.

यावेळी मुंबई विद्यापीठाचे डॉ. दीपक पवार, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. गोविंद कोळेकर, उपकुलसचिव संध्या अडसुळे आणि जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर उपस्थित होते.



महाराष्ट्र राज्य शासनाचा वाङ्मय पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल डॉ. प्रकाश पवार यांचा शिवाजी विद्यापीठातर्फे ग्रंथभेट देऊन अभिनंदन करताना कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के. सोबत (डावीकडून) संध्या अडसुळे, डॉ. गोविंद कोळेकर, डॉ. दीपक पवार, डॉ. श्रीकृष्ण महाजन, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील आणि डॉ. आलोक जत्राटकर

12 FEB 2025

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# वि. स. खांडेकर हे जीवनवादी लेखक


## रवींद्र ठाकूर : शिवाजी विद्यापीठात व्याख्यान

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ११ : वि. स. खांडेकर हे जीवनवादी लेखक होते. जीवनाविषयीचे प्रेम त्यांच्या साहित्यातून जाणवते, असे प्रतिपादन ज्येष्ठ लेखक रवींद्र ठाकूर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील मराठी विभागातर्फे आयोजित डॉ. अनंत व डॉ. श्रीमती लता लाभसेटवार प्रन्यास प्रतिष्ठान अमेरिका पुरस्कृत वि. स. खांडेकर जयंती व्याख्यानमालेत 'वि. स. खांडेकर यांचा जीवनवाद' या विषयावर प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सुनीलकुमार लवटे होते.

ठाकूर म्हणाले, 'खांडेकरांचे साहित्य आदर्श आणि प्रेरक स्वरूपाचे होते. खांडेकर हे लेखकांचे लेखक होते. त्यांच्या लेखनामुळे अनेकांना लेखनाची प्रेरणा मिळाली.'



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील व्याख्यानात बोलताना लेखक रवींद्र ठाकूर.

डॉ. लवटे म्हणाले, 'खांडेकरांना पाश्चात्त्य साहित्याचे विपुल ज्ञान असूनही त्यांच्या लेखणीवर प्रमाण मराठीचा प्रभाव होता. खांडेकरांच्या साहित्यावर इंग्रजीचा प्रभाव दिसून येत नाही.'

डॉ. अनंत लाभसेटवार यांनी या व्याख्यानमालेमागील आपली भूमिका आणि आपल्या जीवनावरील खांडेकरांचा प्रभाव सांगितला. डॉ. अनिल गवळी, गोमटेश्वर पाटील, जयवंत दळवी आदी उपस्थित होते. मराठी विभागप्रमुख डॉ. नंदकुमार मोरे यांनी प्रास्ताविक केले. पाहुण्यांचा परिचय डॉ. रणधीर शिंदे यांनी करून दिला. ज्योती वराळे सूत्रसंचालन केले. अमोल देशमुख यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 FEB 2025
तरुण भारत

# वि. स. खांडेकर हे जीवनवादी लेखक

- ज्येष्ठ लेखक रवींद्र ठाकूर यांचे प्रतिपादन

**कोल्हापूर :** जीवनाविषयीचे प्रेम खांडेकरांच्या साहित्यातून जाणवते. वि. स. खांडेकर हे जीवनवादी लेखक होते, असे प्रतिपादन ज्येष्ठ लेखक डॉ. रवींद्र ठाकूर यांनी केले.



शिवाजी विद्यापीठातील मराठी विभागातर्फे आयोजित डॉ. अनंत व डॉ. लता लाभसेटवार प्रन्यास प्रतिष्ठान अमेरिका पुरस्कृत वि. स. खांडेकर जयंती व्याख्यानमालेत 'वि. स. खांडेकर यांचा जीवनवाद' या विषयावर ते बोलत होते.

डॉ. ठाकूर म्हणाले, खांडेकरांचे साहित्य आदर्श आणि प्रेरक स्वरूपाचे होते. खांडेकर हे लेखकांचे लेखक होते. त्यांच्या लेखनामुळे अनेकांना लेखनाची प्रेरणा मिळाली. अध्यक्षस्थानावरून डॉ. सुनीलकुमार लवटे म्हणाले, खांडेकरांना पाश्चात्य साहित्याचे विपुल ज्ञान असूनही त्यांच्या लेखनीवर मराठीचा प्रभाव होता. खांडेकरांच्या साहित्यावर इंग्रजीचा प्रभाव दिसून येत नाही.

डॉ. अनंत लाभसेटवार यांनी मनोगत व्यक्त केले. मराठी विभागप्रमुख डॉ. नंदकुमार मोरे यांनी प्रास्ताविक केले. पाहुण्यांचा परिचय डॉ. रणधीर शिंदे यांनी करून दिला. सूत्रसंचालन ज्योती वराळे यांनी केले. आभार अमोल देशमुख यांनी मानले. यावेळी डॉ. अनिल गवळी, डॉ. गोमटेश्वर पाटील, डॉ. जयवंत दळवी, संशोधक, विद्यार्थी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

12 FEB 2025


महा न्यूज & व्ह्यूज

वामाक्षी BOUTIQUE
Hanuman Nagar, ITI-Pachgaon road,
Front of Nirmiti Corner Appartment, Kolhapur.
Mob.- 9175089609

# खांडेकर हे जीवनवादी लेखक : रवींद्र ठाकूर

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

वि. स. खांडेकर हे जीवनवादी लेखक होते असे प्रतिपादन ज्येष्ठ लेखक रवींद्र ठाकूर यांनी केले. ते शिवाजी विद्यापीठातील मराठी विभाग आयोजित डॉ. अनंत व डॉ. श्रीमती लता लाभसेटवार प्रन्यास प्रतिष्ठान अमेरिका पुरस्कृत वि. स. खांडेकर जयंती व्याख्यानमालेत 'वि. स. खांडेकर यांचा जीवनवाद' या विषयावर प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. ते पुढे म्हणाले की, जीवनाविषयीचे प्रेम खांडेकरांच्या साहित्यातून जाणवते. खांडेकरांचे साहित्य आदर्श आणि प्रेरक स्वरूपाचे होते. खांडेकर हे लेखकांचे लेखक होते. त्यांच्या लेखनामुळे अनेकांना लेखनाची प्रेरणा मिळाली. कार्यक्रमाच्या



अध्यक्षस्थानी डॉ. सुनीलकुमार लवटे होते. ते आपल्या मनोगतामध्ये म्हणाले की, खांडेकरांना पाश्चात्य साहित्याचे विपूल ज्ञान असूनही त्यांच्या लेखनीवर प्रमाण मराठीचा प्रभाव होता. खांडेकरांच्या साहित्यावर इंग्रजीचा प्रभाव दिसून येत नाही.

या कार्यक्रमात डॉ. अनंत लाभसेटवार यांनी या व्याख्यानमालेमागील आपली भूमिका आणि आपल्या जीवनावरील खांडेकरांचा प्रभाव सांगितला. मराठी विभागप्रमुख डॉ. नंदकुमार मोरे यांनी प्रास्ताविक केले. पाहुण्यांचा परिचय डॉ. रणधीर शिंदे यांनी करून दिला. सूत्रसंचालन ज्योती बराळे तर आभार अमोल देशमुख यांनी मानले कार्यक्रमासाठी डॉ. अनिल गवळी, डॉ. गोमटेश्वर पाटील, डॉ. जयवंत दळवी, संशोधक विद्यार्थी, एम. ए.चे विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 FEB 2025
लोकमत

# नॅनो संमिश्रापासून सौरऊर्जा संशोधनास जर्मनचे पेटंट


## विद्यापीठातील संशोधकांचे यश : बाईंडरविरहित पद्धती

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठाच्या संशोधकांनी नॅनो संमिश्रापासून सौरऊर्जा निर्माण करणारी अभिनव बाईंडरविरहित पद्धती विकसित केली आहे. या पद्धतीस जर्मन सरकारचे पेटंट प्राप्त झाले.

विद्यापीठाच्या इनोव्हेशन, इनक्युबेशन व लिंकेजेसचे संचालक डॉ. सागर डेळेकर यांच्यासह डॉ. क्रांतिवीर मोरे, डॉ. तुकाराम डोंगळे, भारती विद्यापीठाच्या मेकॅनिकल विभागाचे प्रमुख डॉ. सुनील कदम, डॉ. प्रमोद कोयले, डॉ. अनंत दोडमणी, डॉ. दीपक कुंभार यांनी या संशोधन प्रक्रियेत सहभाग घेतला.

हे संशोधन सौरऊर्जा निर्मिती क्षेत्राला गती देणारे ठरेल, असा विश्वास डॉ. डेळेकर यांनी व्यक्त केला. नॅनो संमिश्रे आणि त्यापासून तयार करावयाचे उपकरण कमीत कमी तापमानात आणि अत्यल्प वेळेमध्ये बनवता येते. हे उपकरण संशोधकांसाठी उपयुक्त ठरेल, असेही ते म्हणाले. या संशोधनाबद्दल कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, विभागप्रमुख डॉ. कैलास सोनवणे यांनी शोधकांचे अभिनंदन केले.


सागर डेळेकर


तुकाराम डोंगळे


दीपक कुंभार


प्रमोद कोयले


सुनील कदम


क्रांतिवीर मोरे

### सौरऊर्जा क्षेत्राला चालना

संशोधकांनी नॅनो संमिश्रापासून सौरऊर्जा निर्माण करणारी पद्धत कमी खर्चामध्ये तयार केली आहे. कॅडमियम सल्फाइड क्वांटम डॉट, नैसर्गिक रंग, टायटॅनियम डायऑक्साईडच्या नॅनो मूलद्रव्यांचा वापर केला आहे. यामुळे सौरऊर्जा क्षेत्राला नवीन चालना मिळेल.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 FEB 2025

पुढारी

# 'रेडिओच्या बोली'वर आज शिवाजी विद्यापीठात व्याख्यान

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनामध्ये जागतिक रेडिओ दिनानिमित्त बुधवारी (दि. १२) दुपारी चार वाजता 'रेडिओची बोली' या विषयावर आरजे झाहिद यांच्या विशेष व्याख्यानाचे आयोजन केले आहे. हा कार्यक्रम सर्वांसाठी खुला असून, रेडिओबद्दल जिज्ञासा असणाऱ्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 FEB 2025
लोकमत

# 'रेडिओच्या बोली'वर आज विद्यापीठात व्याख्यान

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनामध्ये जागतिक रेडिओ दिनानिमित्त बुधवारी सायंकाळी चार वाजता 'रेडिओची बोली' या विषयावर आरजे झाहिद यांच्या विशेष व्याख्यानाचे आयोजन केले आहे. कार्यक्रम सर्वांसाठी खुला असून, यात सहभागी व्हावे, असे आवाहन अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 FEB 2025

महा न्यूज & व्ह्यूज

वामाक्षी BOUTIQUE
Hanuman Nagar, ITI-Pachgaon road,
Front of Nirmiti Corner Appartment, Kolhapur.
Mob.- 9175089609

# 'रेडिओच्या बोली' वर उद्या विद्यापीठात व्याख्यान

**कोल्हापूर :**

शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनामध्ये जागतिक रेडिओ दिनानिमित्त बुधवार दि. १२ फेब्रुवारी रोजी दुपारी चार वाजता 'रेडिओची बोली' या विषयावर आरजे झाहिद यांच्या विशेष व्याख्यानाचे आयोजन केले आहे. हा कार्यक्रम सर्वांसाठी खुला असून रेडिओबद्दल जिज्ञासा असणाऱ्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 FEB 2025
पुण्यनगरी

# भाषा हा ज्ञानप्राप्तीचा राजमार्ग

## डॉ. नंदकुमार मोरे : न्यू कॉलेजमध्ये पारितोषिक वितरण

**कोल्हापूर :** भाषा हा ज्ञानप्राप्तीचा आणि अनुभव समृद्धीचा सर्वोत्तम रस्ता आहे. आजच्या कार्पोरेट जगतामध्ये चांगले लिहिता वाचता, संभाषण करता येणे ही भाषेची आजची प्राथमिकता आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे मराठी अधिविभागप्रमुख डॉ. नंदकुमार मोरे यांनी केले.

न्यू कॉलेज मराठी विभागाने आयोजित पारितोषिक वितरण समारंभ आणि मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याच्या समारोप समारंभात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ. आर. डी. ढमकले होते. प्राचार्य डॉ. व्ही. एम.पाटील यांच्या प्रोत्साहन आणि मार्गदर्शनामुळे मराठी विभागाने मराठी भाषा आणि संस्कृतीचा संवर्धन जागर घडवून आणला. स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभाचे नियोजन मराठी विभागप्रमुख प्रा. जी. आर. पाटील यांनी केले होते. यावेळी विजेत्यांना ग्रंथ भेट आणि प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले. आभार डॉ. एम. ए. नायकवडी यांनी मानले. सूत्रसंचालन सायली पाटील हिने केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 FEB 2025
तरुण भारत

# 'भाषा ज्ञानप्राप्तीचा समृध्द मार्ग'

प्रतिनिधी
कोल्हापूर

भाषाप्रेमी होवून जिज्ञासू रसिकवृत्तीने मार्गस्थ झाल्याने खजिना प्राप्त होतो. भाषा हा ज्ञान प्राप्तीचा आणि अनुभव समृध्दीचा सर्वोत्तम मार्ग आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठातील मराठी अधिविभागप्रमुख डॉ. नंदकुमार मोरे यांनी केले.

न्यू कॉलेजमधील आयोजित पारितोषिक वितरण समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ. रघुनाथ ढमकले होते. डॉ. मोरे म्हणाले, संवादाने माणूस माणसांच्या सुख, दु:खाशी जोडला जातो. नात हे संवादावर टिकते, मन हलक होते, तणावमुक्त जीवनासाठी मानवी संवादाची प्रक्रिया वाढली पाहिजे. प्रतिभा कांबर्ळेला भाषा भूषण सन्मानाने गौरविले. डॉ. जी. आर. पाटील यांनी प्रास्ताविक केले. डॉ. एम. ए. नायकवडी यांनी आभार मानले, सायली पाटील यांनी सूत्रसंचालन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 FEB 2025
लोकमत

# 'हवामान बदलाचा पावसावरील परिणाम याचा अभ्यास आवश्यक'

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** हवामान बदल आणि त्याचा पावसावर होणारा परिणाम याचा सखोल अभ्यास करणे अत्यंत गरजेचे आहे, असे मत इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ ट्रॉपिकल मेट्रोलॉजी येथील तज्ज्ञ डॉ. हामझा वरिकोडण यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाचा भूगोल अधिविभाग, हवामान बदल आणि शाश्वत अभ्यास केंद्र, पर्यावरण शास्त्र विभाग, पतंगराव कदम महाविद्यालय, सांगली यांच्या वतीने डॉ. हाफजा वरिकोडण यांचे 'हवामान बदल आणि अतिवृष्टी' या विषयावर व्याख्यान झाले.

आयआयटीएमचे डॉ. धियागसेन धर्मराज अध्यक्षस्थानी होते. डॉ. वरिकोडण म्हणाले, भारतातील महापूर आणि दुष्काळाच्या घटनांचे सखोल विश्लेषण करणे अत्यावश्यक आहे, कारण त्यांचा देशाच्या अर्थव्यवस्थेवर महत्त्वपूर्ण परिणाम होतो.

यावेळी राणी पवार, आयआयटीएमचे प्रकल्प संशोधक अक्षय पाटील, शिक्षक, विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते. डॉ. सचिन पन्हाळकर यांनी स्वागत केले. डॉ. दादा नाडे यांनी परिचय करून दिला. डॉ. आसावरी जाधव यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 FEB 2025
लोकमत

# ग्रामीण जीवनाचे घडविले दर्शन

प्रा. रणधीर शिंदे
साहित्यिक, कोल्हापूर

**रा. रं. बोराडे** यांची या सात दशकातील वाङ्मयनिर्मिती बहुविध, आणि वैशिष्ट्यपूर्ण आहे. ग्रामीण जीवनाचे दर्शन घडविणारे संवेदनशील लेखक म्हणून त्यांची वेगळी ओळख निर्माण झाली, ती त्यांच्या वाङ्मयातील जीवनदृष्टीमुळे. कथाकार आणि कादंबरीकार म्हणून त्यांना ओळखले जात असले तरी त्यांनी बालसाहित्य, नाटक, एकांकिका या प्रकारातही महत्त्वाची निर्मिती केली. 'पाचोळा' या १९७१ साली प्रकाशित झालेल्या त्यांच्या कादंबरीने ग्रामीण जीवनाचे नवे दर्शन घडविले.

आधुनिकता आणि परंपरेतील टकरावाचे दर्शन होते. पारंपरिक व्यवसाय आणि नव्या बदलात वाताहत झालेल्या कुटुंबाची 'पाचोळा' ही शोकांतकथा होती. कादंबरीतील पारबतीचे स्वकथन हे करुण आणि हृदयद्रावक होते. लातूर परिसर बोली आणि पारबतीच्या व्यक्तिबोलीतील हे वेल्हाळ व्याकूळ मायाळू कथन होते. ग्रामीण कुटुंबातील ताणतणाव, नातेसंबंधांचे, मानवी वर्तन आणि जातीय अहंगंडाचे व मानापमानाचे चित्रण हा त्यांच्या कथेचा मुख्य बाज होता. ग्रामीण जीवनातील ठळक आणि वेधक स्त्रीदर्शन हे तिचे महत्त्वाचे वैशिष्ट्य होते. १९९० नंतरच्या त्यांच्या कथा कादंबऱ्यास ग्रामीण समस्या चित्रणाचा फलक प्राप्त झाला. रा. रं. यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विशेष म्हणजे वाङ्मयीन चळवळीचे संघटक म्हणून त्यांची विशेष ख्याती होती. त्यांची नव्या लेखनाविषयीची भूमिका उदार आणि स्वागतशील होती. अनेक नवोदितांची पुस्तके वाचून घेत. त्यांना कळवत. त्यांचा सन्मान करीत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 FEB 2025
पुढारी

# विद्यापीठाकडून आजअखेर ६४८ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर-नोव्हेंबर हिवाळी सत्रातील सुमारे ६४८



अभ्यासक्रमांचे निकाल घोषित करण्यात आले आहेत. विद्यापीठ संलग्न महाविद्यालयांत पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षा सध्या सुरू आहेत. मंगळवार, दि. ११ रोजी एम. ए. (मास कम्युनिकेशन), बी. टेक., एम. ए. (राज्यशास्त्र), एम. ए. (हिंदी), एमजे., एम. एस्सी. (अप्लाईड केमेस्ट्री), एम. एस्सी. (इंडस्ट्रीयल मॅथ्यस वुईथ कॉम्प्युटर सायन्स) आदी ३८ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले आहेत, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 FEB 2025

पुण्यनगरी


# ‘रेडिओच्या बोली’वर आज व्याख्यान

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनामध्ये जागतिक रेडिओ दिनानिमित्त बुधवार, दि. १२ रोजी दुपारी ४ वाजता ‘रेडिओची बोली’ या विषयावर आरजे झाहिद यांच्या विशेष व्याख्यानाचे आयोजन केले आहे. हा कार्यक्रम सर्वांसाठी खुला असून, रेडिओबद्दल जिज्ञासा असणाऱ्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी केले.

12 FEB 2025
रणझुंजार

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# नॅनो संमिश्रापासून सौरऊर्जा निर्माण करणाऱ्या अभिनव संशोधनास जर्मन पेटंट




डॉ. सागर डेळेकर




डॉ. तुकाराम डोंगळे



डॉ. दीपक कुंभार



डॉ. प्रमोद कोयले



डॉ. सुनिल कदम



डॉ. क्रांतीवीर मोरे

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या संशोधकांनी नॅनो संमिश्रापासून सौरऊर्जा निर्माण करणारी अभिनव बाईंडरविरहित पद्धती विकसित केली आहे. या पद्धतीस जर्मन सरकारचे पेटंट प्राप्त झाले आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या इनोव्हेशन, इनक्युबेशन व लिंकेजेसचे संचालक तथा रसायनशास्त्रज्ञ डॉ. सागर डेळेकर यांच्यासह डॉ. क्रांतिवीर मोरे, डॉ. तुकाराम डोंगळे, भारती विद्यापीठाच्या मेकॅनिकल विभागाचे प्रमुख डॉ. सुनिल कदम, डॉ. प्रमोद कोयले, डॉ. अनंत दोडामणी (एस.जी.एम. कॉलेज, कराड), डॉ. दीपक कुंभार (ए.एस.सी. कॉलेज, इचलकरंजी) यांनी सदर संशोधन प्रक्रियेत सहभाग घेतला. हे संशोधन सौरऊर्जा निर्मिती क्षेत्राला गती देणारे ठरेल, असा विश्वास डॉ. डेळेकर यांनी व्यक्त केला. तयार केलेली वेगवेगळी नॅनोसंमिश्रे आणि त्यापासून तयार करावयाचे उपकरण कमीत कमी तापमानात आणि अत्यल्प वेळेमध्ये बनवता येते, तसेच ते सुलभतेने हाताळता येते. हे उपकरण तसेच ते तयार करण्याची पद्धत सौरऊर्जा क्षेत्रात काम करणाऱ्या संशोधकांसाठी उपयुक्त ठरेल, असेही ते म्हणाले. सौरऊर्जेचे उत्पादन त्या उपकरणामध्ये वापरल्या जाणाऱ्या अनेक घटकांवर अवलंबून असते. तसेच ते उपकरण बनवण्यासाठी वापरली जाणारी पद्धतही महत्त्वाची ठरते. विद्यापीठातील संशोधकांनी वेगवेगळ्या नॅनो संमिश्रापासून सौरऊर्जा निर्माण करणारी पद्धत कमीत कमी वेळेमध्ये आणि कमी खर्चामध्ये तयार केली आहे. यामध्ये कॅडमियम सल्फाइड क्वांटम डॉट, नैसर्गिक रंग, टायटॅनियम डायऑक्साईडच्या नॅनोमूलद्रव्यांचा वापर केला आहे. या नाविन्यपूर्ण संशोधनामुळे सौर ऊर्जा क्षेत्राला नवीन चालना मिळेल.

या संशोधनाबद्दल विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, विभागप्रमुख डॉ. कैलास सोनवणे सर यांनी सर्व संशोधकांचे अभिनंदन केले आहे.